SJIF 2015 : 3.801
ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# सयाजीराव महाराजांची आर्थिक सुधारणातील योगदान आणि त्याची समकालीन प्रासंगिकता

**प्रा. पाटील अनिल निंबा**

*कर्मवीर आबासाहेब तथा ना. म. सोनवणे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सटाणा,*
*ता. बागलाण जि. नाशिक*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रस्तावना

सयाजीराव गायकवाड यांचा कालखंड हा ब्रिटीश वसाहत वादाचा कालखंड होता. ब्रिटिश वसाहतवादाच्या कालखंडामध्ये तत्कालीन अर्थतज्ञ सामाजिक सुधारक व ब्रिटीश राज्यकर्ते हे त्यांनी निर्माण केलेल्या आर्थिक चौकट मांडण्याचा प्रयत्न केला गेला. या आर्थिक चौकटीमध्ये म्हणजेच वसाहतवादी आर्थिक चौकटीमध्ये दोन प्रकारच्या समस्या उद्भवत असतात . एका बाजूला ही आर्थिक चौकट ब्रिटिशांच्या वसाहतिक धोरणांच्या दृष्टिकोनातून विकसित करण्यात आली होती. त्यामुळे सहाजिकच ब्रिटिशांच्या वसाहतवादाला पूरक ही चौकट होती. दुसऱ्या बाजूला या आर्थिक चौकटीची मर्यादा म्हणजे औद्योगिकीकरणाला चालना देऊन सुद्धा भारतातील शेती ही प्रामुख्याने औद्योगीकरणाला पूरक उत्पादन करण्यासाठी निर्माण करणारी पिके तयार करण्यात आली होती. सयाजीराव गायकवाड यांनी आर्थिक विचारात एक शाश्वत आर्थिक विकासाची धोरणी व व दूरगामी सामाजिक जीवनावर करणारी परिणाम याचा समन्वय साधणारी होती. सयाजीराव गायकवाड केवळ राजकीय राज्यकर्ते म्हणून त्यांच्या कार्यांच्या मर्यादित अवकाश नव्हता तर व्यापक अर्थाने ते अर्थकारणाच्या विविध पैलू बद्दल आपले चिंतन आपल्या भाषणाच्या माध्यमातून अभिव्यक्त केल्याचे दिसते.

सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या आर्थिक विचारांचा मागोवा घेत असताना, महाराज आणि तत्कालीन परिस्थितीमध्ये केलेल्या आर्थिक सुधार आज सुद्धा प्रासंगिक आहे. जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण या नाव विकासाचा सुसाट घोडा एका बाजूला नैसर्गिक साधन संपत्ती यांची मालकी विशिष्ट गटाकडे केंद्रीकृत होताना दिसते. बहुतांशी समाजघटकांना बहिष्कृत केले जाते. दुसऱ्या बाजूला विकासाच्या चर्चा विश्वामध्ये सर्वसामान्य जनता त्यामध्ये प्रामुख्याने कामगार,k कष्टकरी

बहिष्कृत होताना दिसत आहे. जागतिकीकरणाचे या प्रक्रियेमध्ये सयाजीराव गायकवाड महाराज यांचे विचार कामगार, कष्टकरी वर्गाच्या हिताचे होते लोककल्याणकारी भूमिकेचे होते त्याचासुद्धा आढावा घेणे वस्तुत शोध निबंधाचा उद्देश आहे.

**1. भारताच्या दारिद्याचा मूलगामी चिंतन**

एकोणिसाव्या शतकामध्ये भारतातील अभिजात विचारवंत त्यांनी भारतातील दारिद्याच्या कारणांचा वेध घेण्यास सुरुवात केली. भारतामध्ये निर्माण झालेल्या दुष्काळ, शेतकऱ्याची भीषण अवस्था किंवा यासारखे अशा अनेक आरोग्य तत्सम प्रश्नाचा वेध घ्यायचा असेल तर त्याच्या मूलगामी विचार केला पाहिजे. म्हणून न्यायमूर्ती रानडे, दादाभाई नवरोजी किंवा अशा अनेक महत्त्वाच्या सामाजिक सुधारणा आणि अर्थशास्त्रज्ञांनी भारतीय दारिद्य वेध घेण्याचा प्रयत्न करू लागलो. अनेक समाजसुधारकांमध्ये आणि अर्थतज्ञ मध्ये सयाजीराव गायकवाड यांचे सुद्धा योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे त्यांनी सुद्धा मोठ्या प्रमाणात भारतीय आधारित व्यवस्था आणि एकूणच भारताची अर्थव्यवस्था याचा मूलगामी अभ्यास करून मोठ्या प्रमाणात आपले विचार मांडले. सयाजीराव गायकवाड म्हणतात की "आमचा विस्कळीत समाज इंग्रजाच्या उत्साही व सुसंघटित समाजाच्या मानाने अगदी वेगळा दिसतो. आमची सारी उत्तम उत्तम शक्ती फक्त हाताने दुसऱ्याचे हुकूम पाळला आहे. डोक्याने नवीन कल्पना काढणार नाही. आमच्या कल्पकतेची कमी आहे देव वादाचा व निष्क्रियतेच्या शिकवणुकीने आमचे सारी कृत वठली आहे" भारतातील अर्थव्यवस्थेमध्ये भारतातील सामाजिक आर्थिक परिस्थिती जबाबदार आहे. तितकीच भारतातल्या सर्वसामान्य लोकांची वैचारिक भूमिका ही सुद्धा महत्त्वाचे आहे. सयाजीराव गायकवाड म्हणतात त्याप्रमाणे भारतातील लोक हे प्रामुख्याने दैववाद व निष्क्रियतेच्या संस्कृतिक मूल्यामध्ये अडकल्यामुळे व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा आणि भौतिक विकास अभावामुळे मोठ्या प्रमाणात विकास करण्यात अडथळा निर्माण होत असल्याचा दावा केला आहे. म्हणून महाराजांनी आर्थिक विकास अशा प्रकारचे विचार भारताच्या आर्थिक आणि राजकीय पोषक असल्याचा प्रतिपादन केले आहे.

**2. सहकार चळवळीची स्थापना आणि विस्तार**

भारताच्या आर्थिक विकासामध्ये सयाजीराव गायकवाड यांनी सहकार चळवळीची मुहूर्तमेढ सुरुवात केली. सयाजीराव गायकवाड यांना सहकार चळवळीचे महत्त्व माहित होते. विना सहकार नाही उद्धार ही त्यामागची महत्त्वाची तात्विक भूमिका होती. म्हणून महाराज म्हणतात की "ज्या गावी सहकारी संस्था असेल ते गाव आर्थिक दृष्ट्या एक संपूर्ण घटक मानले पाहिजे आधुनिक संस्कृतीला अशा घटकाची जरुरी आहे कारण स्वयंपूर्ण घटकाचे समुदाय बनवण्याकडे सध्याच्या संस्कृतीची प्रगती आहे. विक्री व वव्य उत्पादन या बाबतीत जरी गावकरी एक होऊन व्यवहार करतील तर त्याप्रमाणे त्याचे उत्पन्न व सुखी वाढतच जातील. ही महाराजांची उदात्त भूमिका होती त्यामुळे महाराजांनी सहकार चळवळीला मोठ्या

प्रमाणात प्रोत्साहन देऊन बडोदा संस्थानात सहकार चळवळीची चालना दिली". इसवी सन 1888 मध्ये त्यांनी पहिली सहकारी बँकेची स्थापना केली. त्यासोबतच शेतीला मोठ्या प्रमाणात वित्तीय पुरवठा करण्यासाठी भूविकास बँकेचे स्थापना सुद्धा त्यांनी केलेली होती. 1899 मध्ये सोनवडे आणि व्यारा येथे कृषी विकासासाठी स्थापन बडोदा संस्थानात मोठ्या प्रमाणात सहकारी संस्थांचे जाळे विस्तारले गेल्यामुळे शेतीच्या व्यवसायामध्ये व विकासामध्ये मोठे प्रमाणात भर पडली. शेतीसाठी आवश्यक लागणारी अत्याधुनिक साधने आणि तंत्रज्ञानी खरेदी करण्यासाठी चालना मिळाली. त्यासोबतच लघुउद्योग आणि मोठे उद्योग यांनासुद्धा सहकारी संस्था नावे चालना मिळाली तात्पर्य मोठ्या प्रमाणात सहकारी चळवळीचा विस्तार झाला. बँके यानंतर 1914 पर्यंत जवळपास बडोदा संस्थानामध्ये 236 सहकारी बँकेची स्थापना झाली होती.

**3. व्यापार, उद्योग वाढ आणि दळणवळणासाठी रेल्वे विस्ताराचा प्रकल्प**

बडोदा संस्थान मध्ये मोठ्या प्रमाणामध्ये व्यापाऱ्यांनी उद्योगाला चालना द्यायची असेल तर रेल्वेच्या अत्यंत आवश्यक आहे. रेल्वेच्या माध्यमातून शेतीमधील किंवा इतर क्षेत्रांमधील उत्पादित माल विविध ठिकाणी घेऊन जाण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यासोबतच बडोदा संस्थानातील विविध भागांमध्ये राहणाऱ्या लोकांना इतर भागांमध्ये रोजगारासाठी किंवा इतर क्षेत्रांमध्ये जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात दळणवळणाची सोय या रेल्वेच्या माध्यमातून केली जाते. म्हणून महाराजांनी बरदास संस्थानमध्ये मोठ्या प्रमाणात रेल्वेची जाळी विस्तारले. उदाहरण म्हणून बघायची झाली तर 1875 मध्ये बडोदा राज्यात 19 मैल लांबीची रेल्वे लाईन होते. त्याचा विस्तार करून महाराजांनी 700 हून अधिक लांबीचे रेल्वे लाईन टाकली. यावरुन आपल्याला लक्षात येते की व्यापार वाढीसाठी आणि प्रवाशांच्या वाहतुकीसाठी रेल्वेची खूप महत्त्वाचे भूमीका होती. त्यासोबत दुसरा एक महत्त्वाचा फायदा होता की, लोकांच्या दळणवळणाची सुविधा मोठ्या प्रमाणात झाले गेले. यामुळे आर्थिक विकासासोबतच लोकांच्या सांस्कृतिक जीवनाची एकमेकांशी परिचय झाल्यामुळे लोकांच्या पारंपारिक दृष्टीकोण बदलून आधुनिक होण्यास खूप महत्त्वाचे योगदान दिले गेले. आयात-निर्यात होण्याचा फायदा बडोदा संस्थांमधील मोठ्या प्रमाणात लोकांना रेल्वेच्या माध्यमातून होण्यास सुरुवात झाली.

**4. बँक ऑफ बडोदा ची स्थापना**

आर्थिक विकासासाठी वित्तीय पुरवठा अत्यंत गरजेचा असतो. वित्तीय पुरवठा च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात शेतीला पूरक व्यवसायाला गती देता येते व त्यासोबतच लघुउद्योग आणि मोठे उद्योग यांना मोठ्या प्रमाणात चालना देण्यासाठी प्रोत्साहन देतो. म्हणून बँकेची स्थापना करणे अत्यंत गरजेचे आहे. हा निर्णय म्हणून 1908 मध्ये बडोदा बँकेची स्थापना महाराजांनी केलेली होती. या बँकेच्या स्थापनेमध्ये महाराजांनी बडोदा संस्थानातील महत्त्वाच्या आणि प्रतिष्ठित लोकांचा सहभाग करून घेतला. जेणेकरून बँकेची

विश्वासार्हता आणि विस्तार वाढेल ही त्यामागची उदात्त भूमिका होत्या. त्यामध्ये प्रामुख्याने दिवान बहादुर अंबालाल साकरलाल नामदार सर विठ्ठल राव ठाकरसी यांचा सहभाग करून बँकेला एक प्रतिष्ठा मिळवून दिली. बडोदा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये पतपुरवठा करण्यासाठी व्यापार आणि उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी वित्तीय पुरवठा करण्यात बडोदा बँक किती महत्त्वाची भूमिका पार पाडली. लोकांच्या बँकेच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार व त्यासोबतच दैनंदिन गरजेसाठी वित्तीय पुरवठा या बँकेच्या माध्यमातून केला जाऊ लागला. महाराजांनी बडोदा बँकेची स्थापना केल्यामुळे बडोदा बँकेतील मोठमोठे उद्योगपती ना उद्योग करण्यासाठी चालना मिळाली आणि त्यासोबतच रोजगार निर्मिती झाली. अनेक कामगारांना काम मिळाले. भारतातल्या मोठे मोठे उद्योगपती कर्जाची गरज बँक ऑफ बडोदा निभावली. याचा दूरगामी परिणाम भारतातील देशी उद्योगपती आणि व्यापारी निर्माण करण्यामध्ये बँक ऑफ बडोदा ची एक महत्त्वाची भूमिका होती. भारतातील औद्योगिक आणि व्यवसायिक क्षेत्रांमध्ये बँक ऑफ बडोदा आपले नाव मोठ्या प्रमाणात विस्तारले गेले.

**5. सयाजी सरोवराची सुरुवात**

पाण्याचा प्रश्न हा बडोदा संस्थानासाठी अत्यंत कळीचा होता. मोठ्या प्रमाणात दुष्काळ यामुळे बडोदा संस्थानांमध्ये मोठ्या प्रमाणात लोकांना हाल-अपेष्टा सामोरे जावे लागत होते. म्हणून सयाजीराव गायकवाड यांनी मोठ्या प्रमाणात पाण्यासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या योजना टाकल्या होत्या. वर्धा संस्थानातील सर्व नद्या च्या एकीकरणाचा आणि सर्वसामान्य लोकांना पाणीपुरवठा करणाऱ्या महत्त्वाच्या योजना उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे लोकांच्या पाण्याचा प्रश्न विशेषता पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडवला गेला . यातूनच त्याने अनेक धरणे व विहिरी बांधकामाचे योजना हाती घेतली. त्यामुळे ग्रामीण भागात आणि सर्वसामान्य शेतकऱ्यांना व शेतमजुरांना स्वच्छ आणि आरोग्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत चांगले पाणी बडोदा संस्थानात उपलब्ध झाले. याच पाण्याच्या एका उपक्रमांपैकी 29 मार्च 1892 वातावरण तयार केलेले होते. हा वाटर व प्रामुख्याने पूर्व दिशेला बांधा 3 || मैल लांब आहे. टी 20 फूट जास्तीत जास्त खोल आहे आणि 5 || मैल चौरस विस्तारलेले पाण्याचेही धरण श्री सयाजीराव सर्व या नावाने सर्वसामान्य लोक ओळखू लागले आणि त्याचे नामकरण हे त्याच दिवशी झाले. पाण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे धरण होते. लोकांना स्वच्छ आणि आरोग्याच्या दृष्टिकोनातून चांगले पाणी उपलब्ध होणे हे या सरोवराचे महत्त्वाचे उद्दिष्ट होते. या धरणामुळे वर्धा संस्थानातील अनेक शहरे आणि गावांना चांगले आणि मुबलक पाणी उपलब्ध होऊ लागले.

**6. शेतीच्या अभ्यासासाठी परदेशी सहल**

सयाजीराव गायकवाड हे प्रगल्भ राजकीय नेतृत्व होते. जगातल्या मानवी मुक्तीसाठी नवीन नवीन प्रयोग हा त्यांच्या अभ्यासाचा आणि चिंतनाचा मूळ गाभा होता. त्यामुळे जगभरामध्ये मोठ्या प्रमाणात सामान्य

आणि कष्टकऱ्यांच्या हितासाठी चे प्रयोग पाहणे हा त्यांच्या राजकीय दृष्टिकोनातून एक प्राधान्यक्रम होता . इतकेच नाही तर त्यासाठी त्यांनी महाराजांनी वेगवेगळ्या विविध प्रयोगाचे बडोदा संस्थानातील लोकांना परिचित हवा व त्याचा अभ्यास करावा यातून बडोदा संस्थानमध्ये मोठ्या प्रमाणात शेतीच्या क्षेत्रामध्ये उच्च शिक्षणाला कम मिळावा यासाठी त्यांनी अनेक मोठ्या प्रमाणात बडोदा संस्थानातील लोकांना त्यांनी शेतीविषयक शिक्षण घेण्यासाठी परदेशी पाठवले. त्यातीलच खासेराव जाधव यांना त्यांनी उच्च शेतीविषयक उच्च शिक्षणात परदेशी पाठवून मोठ्या प्रमाणात त्यांच्यावरती घात केला. शेतीच्या शिक्षण क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात लोकांनी शिक्षण घेतले पाहिजे आणि त्याचा फायदा बडोदा संस्थानातील संस्था व सामान्य शेतकऱ्यांना झाला पाहिजे ही त्यामागची भूमिका होती. खाशेराव जाधव यांनी मोठ्या प्रमाणात शेतीविषयक पुस्तकाच्या अभ्यास करून परदेशातील अनेक महत्त्वाचे पुस्तके बडोदा संस्थानांमध्ये खरेदी करून आल्या व त्यासाठी त्याचा मराठी गुजराती अशा अनेक भाषांमध्ये अनुवाद करून सर्वसामान्य शेतकऱ्याला हे पुस्तके उपलब्ध करून दिली

**7. शेतीसाठी पाणी**

सयाजीराव गायकवाड यांनी शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा केली. त्यामध्ये प्राधान्यक्रमाने शेतीमध्ये अत्याधुनिक बियाण्यांची लागवड करून शेतीतील उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढली. शेती कसण्यासाठी चे पारंपारिक साधने असल्यामुळे शेती करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वेळेची गुंतवणूक केली जात असेल. व त्यासोबतच मानवी श्रमाचा सुद्धा मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केल्यामुळे हवे तेवढे उत्पादन निर्माण होत नसत किंवा त्याची उत्पादकता वाढवली जात नसत त्यामुळे महाराजांनी अत्याधुनिक ट्रॅक्टर व इतर मशनरी शेतीमध्ये लावून शेतीमध्ये उत्पादक त्याचा मोठा प्रयत्न केला. पण त्यासोबत शेती करायची असेल तर ती पाण्याची केली पाहिजे आणि पाणी उपलब्ध असे होणे अत्यंत गरजेचे आहे. कारण बडोदा संस्थानातील किंबहुना भारतीय संस्थानातील शेतीची करण्याची पद्धत ही नैसर्गिक किंवा निसर्गावर अवलंबून होते. निसर्गाचा पाणी उपलब्ध असेल तर पीक घेतले जात असेल पण त्यामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात दुष्काळ किंवा पूर यामुळे आहे. ते शेती शेतीतील हातात शेतीचे उत्पादन तो शेतकरी घेऊ शकत नसत त्यामुळे महाराजांनी शेती करायची असेल तर शेतीसाठी पाणी आवश्यक आहे आणि त्यामुळे त्यासाठी बडोदा संस्थानातील एक स्वतंत्र पाणीपुरवठा खाते निर्माण केले. हे पाणी पुरवठा खाते शेतीमधील पाण्याचे वितरण आणि उपलब्धता करून देण्यासाठी धरणे विहिरी व महत्त्वाचे सरोवर बांधकामाचे काम या पाणी पुरवठा खात्याच्या अंतर्गत केले जात असे . या पाणीपुरवठा च्या माध्यमातून पाणीपुरवठा शहरात उपलब्ध करून देण्याचे व्यवस्थापन या खात्यांतर्गत केली जात होते. शेतीला पाणी उपलब्ध झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतीमध्ये अत्याधुनिक विज्ञानाच्या आधारे करण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले व शेतीची उत्पादकता वाढली गेली.

**8. शेतीपूरक व्यवसायाला चालना**

सयाजीराव गायकवाड यांनी शेतीपूरक व्यवसायाला खूप मोठ्या प्रमाणात चालना दिली. शेतकऱ्यांची शेती निसर्गावर अवलंबून झाले. शेतकऱ्यांच्या हिताचे तर नाहीच नाही पण बडोदा संस्थानिकाच्या हितासाठी पुरत नाही. त्यामुळे महाराजांनी शेतीपूरक व्यवसायांना मोठ्या प्रमाणात चालना दिली. महाराजांची शेतीला जोडधंदा म्हणून अनेक उद्योग धंदे करावे शेती करताना गाय म्हशी शेळ्या यासारख्या पाळीव व शेतीपूरक प्राण्यांना प्राधान्य द्यावे ही त्यामागची भूमिका होती. त्यामुळे शेतीमध्ये नैसर्गिक किंवा कोणत्याही प्रकारचे संकट आले तरी शेतकरी भरडला जाणार नाही. त्याच्यावरती अन्याय होणार नाही उलट त्याला शेती पूरक व्यवसाय मुळे तो नफ्यामध्ये असेल ही त्यामागची भूमिका होती. जनावरांसाठी महाराजांनी पशुवैद्यकीय दवाखाने काढले होते. या दवाखान्याच्या माध्यमातून पशूंना होणाऱ्या आजाराबद्दल किंबहुना त्यांच्या शारीरिक आणि नैसर्गिक बदलाबद्दल ची समज जनमानसामध्ये विकसित व्हावी. सामान्य लोकांना सहज रित्या पशुपालनाच्या संदर्भात वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हावी ही उदात्त भावना घेऊन महाराजांनी प्रयत्न केलेला होता. जनावरांना होणाऱ्या रोगराई पासून शेतकऱ्यांना सुविधा उपलब्ध व्हावी हीसुद्धा भूमिका त्यामागे होती.

सयाजीराव गायकवाड यांनी लघुउद्योग आणि कुटीर उद्योग याला सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात चालना दिलेली होती. शेती हा एकमेव व्यवसाय नसून शेती पूरक व्यवसाय म्हणजे छोट्या छोट्या व्यवसायांना संधी उपलब्ध करून दिल्यानंतर शेतकऱ्यांचा आर्थिक विकास होतो. त्यांची प्रगती होण्यास मदत होते. ही भूमिका घेऊन महाराजांनी मोठ्या प्रमाणात बडोदा संस्थानमध्ये लहान उद्योगांना चालना दिलेली होती. शेती पूरक व्यवसाय म्हणल्यानंतर त्यासाठी लागणारी भांडवलाची आवश्यकता हा सुद्धा अत्यंत कळीचा प्रश्न होता. आणि हे सर्व कारखाने आणि शेतीला पूरक व्यवसायाला भांडवल उपलब्ध करून देण्यासाठी बडोदा संस्थान आणि पुढाकार घेऊन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात शेतीपूरक व्यवसाय मध्ये सक्रिय करण्यासाठी भांडवल उपलब्ध करून दिले. त्यासाठी सहकार चळवळीला व्यापक प्रमाणात विस्तार करत बडोदा संस्थानमध्ये शेतीपूरक व्यवसायाला मोठ्या प्रमाणात चालना दिली.महाराजांनी मोठ्या प्रमाणात बडोदा संस्थानमध्ये लहान लहान उद्योगांना आणि कोटी उद्योगांना मोठ्या प्रमाणात भांडवल उपलब्ध करून दिले. म्हणून निंबाजी राव पवार म्हणतात की" राज्यात उद्योगधंदे असल्याशिवाय शेतकऱ्यांची प्रगती होणे कठीण आहे हे जाणून या उपक्रमाकडे महाराजांनी यानंतर आपली दृष्टी वळवली प्रथमच 1881 बडोदा येथे स्वतःची एक गिरणी स्थापन करण्यात आली आणि सन 1881 तीन लक्ष रुपये भांडवलाचा साखरेचा कारखाना येथे काढण्यात आला".

**9. सुधारित बी बियाणे लागवड**

बडोदा संस्थानमध्ये किंबहुना भारताच्या तत्कालीन इतिहासामध्ये शेती हा प्रमुख उत्पन्नाचे साधन होते.शेती करण्याचे साधन हे प्रामुख्याने पारंपारिक होते आणि त्यामुळे शेतीच्या उत्पादनात प्रामुख्याने निसर्गावर आधारित असल्यामुळे मोठ्या प्रमाणात मानवी श्रम अस्तित्वात असून सुद्धा उत्पादनामध्ये वाढ होत नव्हती. शेतीची पीक पद्धती हीसुद्धा पारंपरिक होती आणि शेती करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जी साधने वापरली जात होती. तीसुद्धा पारंपारिक होती. म्हणून महाराजांनी अत्याधुनिक पीक पद्धतीचा व बी बियाण्याची पुरवठा शेतकऱ्याला करून दिला. याबाबत दाते म्हणतात की "शेतकऱ्यांना बियाणी पुरवणी शेतीत कशा सुधारणा कराव्यात हे प्रयोग प्रदर्शन भाषण इत्यादी रूपाने शेतकऱ्यांना समजावून देणे वगैरे उद्योग त्या खात्याने हाती घेतले. उत्तम नमुनेदार शेती कशी करावी यासाठी सरकारचे अनुदान नवसारी व बडोदे या ठिकाणी नमूद करून एका तालुक्यातून जे धान्य होत नाही त्याचे दुसऱ्या तालुक्यात कशाप्रकारे करता येईल हे सप्रयोग दाखवण्याची व्यवस्था केली" . अशाप्रकारे महाराजांनी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अत्याधुनिक बी आणि साधनांची ओळख करून दिली त्याचा दूरगामी परिणाम असा झाला की शेतकरी हा उत्पादनाच्या बाबतीत स्वावलंबी झाला. त्यासोबत महाराजांनी सुधारित बी-बियाणे कीटकनाशकाच्या माहितीसाठी पद्धती व पुस्तिका बरदास संस्थानामध्ये छापून सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत ती पुस्तके घेऊन जाण्याचा प्रयत्न केला. ज्यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये अत्याधुनिक बी-बियाणांचा परिचय झाला व मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांमध्ये जनजागृती निर्माण केली. शेतीतील सुधारित वाफेवर चालणारे नांदेड म्हणजे ट्रॅक्टर त्यांनी त्यांच्या परदेशी प्रवासाच्या दरम्यान पाहिला होता तो भारतामध्ये म्हणजे त्यांच्या संस्थानामध्ये शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिला. ज्यामुळे शेतकरी अत्याधुनिक पद्धतीने शेती करून उत्पादनावर होणारा खर्च कमीत कमी करून जास्तीत जास्त उत्पादन आणि नफा मिळतील या उद्देशाने हा ज्ञान म्हणजेच ट्रॅक्टर त्यांनी शेतकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध करून दिला .त्यासोबतच कोंबडी आणि दूध या जनावरांची अत्याधुनिक पैदास त्यांनी करून दिली व मोठ्या प्रमाणात त्यासाठी त्यांनी दूध व तत्सम उत्पादनाला चालना देऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये मोठ्या प्रमाणात भर घातली. जागतिक बाजारपेठेची व भारतीय बाजारपेठ त्याचे संबंध जुळले गेले. व तो मोठ्या प्रमाणात आपला विकास करण्यासाठी कटिबद्ध झाला.

**10. जमीनदार यांच्यावर प्रतिबंध**

भारताच्या मध्ययुगीन काळानंतर विशेषतः सरंजामदारी व्यवस्था अस्तित्वात आल्यानंतर संस्थानिक किंवा इतर जमीनदार ही त्या संस्थानातील किंवा गावातील जमीन ही भाड्याने शेतकऱ्यांना देत असे. त्याचा दूरगामी परिणाम शेतकऱ्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातून त्या जमिनीचे भाडे किंवा शेतीचे भाडे त्यांना द्यावे लागत होते. हीच रचना भारताच्या शेतकऱ्यांसाठी अत्यंत शोषणकारी होती. शेतकऱ्यांना कोणत्याही

संकटाला मग ते नैसर्गिक असो किंवा मानवी असो यामध्ये भाडे देणे माफ होत नसेल. दुष्काळामध्ये सुद्धा जमीनदार लोक मोठ्या प्रमाणात शेतकऱ्याकडून भाडे वसूल केली जात होती. याचा दूरगामी परिणाम शेतकऱ्यांच्या जीवनावरती पडत होता वेळप्रसंगी शेतीचे भाडे देण्यासाठी शेती विकावी लागत असे किंवा पैसा भाड्याने घ्यावे लागतात म्हणजेच सावकाराकडून व्याजाने पैसे घेऊन जमीनदारांना द्यावे लागत होता. अशा प्रकारची शोषणाची व्यवस्था ही मध्ययुगीन काळापासून अस्तित्वात आलेली होती.

बडोदा संस्थानामध्ये सुद्धा ही पद्धत सयाजीराव गायकवाड यांच्यापर्यंत चालत आलेली होती. यातील दुसरा एक महत्त्वाचा भाग म्हणजे अशा अनेक जमिनीचे वाटप हे वेगवेगळ्या धार्मिक क्षेत्रांना आणि जमीनदारांना केले जात होते. धार्मिक क्षेत्राखालील संस्थांच्या आणि जमीनदाराच्या अनेक जमिनी या कराच्या रचनेच्या बाहेर होत्या. धार्मिक संस्थान आणि जमीनदार यांना जी जमीन बडोदा संस्थान यांनी दिली आहे ती त्यांचा करमुक्त होते. ही बाब सयाजीराव गायकवाड यांना जमीन मोजणी चे खाते निर्माण केल्यानंतर लक्षात आलेली होती. सयाजीराव गायकवाड यांना या जमिनीचे क्षेत्र हे उत्पादक क्षेत्र म्हणून आणि कराच्या रचनेमध्ये म्हणजेच शेतसाऱ्याच्या रचनेमध्ये आली पाहिजे यासाठी त्यांनी धार्मिक संस्थांच्या जमिनीवर आणि जमीनदाराच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात निर्बंध घातले आणि त्यांच्यावरचा राबविण्यासाठीच्या आणि जमीन उत्पादक करण्यासाठीच्या बंधनात्मक निर्णय घालून महत्त्वाच्या निर्णय घेतला. या धोरणामुळे बडोदा संस्थानातील अनेक जमीनदार आणि धार्मिक संस्था महाराजांच्या विरोधामध्ये मोठ्या प्रमाणात दबावतंत्राचा वापर करून या धोरणाला विरोध करण्याची भूमिका पार पडली पण महाराजांनी अशा कोणत्याही दबावाला आणि आमिषाला बळी न पडता एक मोठ्या प्रमाणात धोरणात्मक निर्णय घेऊन शेती उत्पादकता वाढवण्यासाठी आणि धार्मिक संस्थांच्या आणि जमीनदाराच्या शेती ही शहराच्या कक्षेत आणण्यात महत्त्वाचे योगदान दिले.

वरील सर्व सयाजीराव गायकवाड यांच्या आर्थिक विचारांची आणि सुधारणा निगडित आहे. सयाजीराव गायकवाड आर्थिक विकासाला चालना दिल्यामुळे बडोदा संस्थानात शेतकरी वर्ग सुधारणेला चालना देण्यात आली. इतकेच नाही तर बडोदा संस्थानातील सर्वसामान्य जनता सुद्धा औद्योगीकरण व्यापार यामुळे रोजगाराची संधी उपलब्ध झाले. अशाप्रकारे आर्थिक क्षेत्र मोठ्या प्रमाणात चालना मिळाली.

## संदर्भसूची

*महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुषः संपादक बाबा भांड, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017*

*सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड 1 शिक्षण धर्म आणि तत्वज्ञान, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017*

*सृष्टीची सेवा, ईश्वराची मैत्री, धर्म विषयक विचार, सयाजीराव गायकवाड,संपादक बाबा भांड ,उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन , प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017*

*सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड 3 राज्य प्रशासन, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017*

*सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड 4, शेती, पाणी आणि उद्योग, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017*